



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २५३, मंगळवार २५ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# ७४ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर पारनेरच्या भूमिपुत्राचे संसदेत पाऊल!

■ खासदार नीलेश लंके यांनी घडविला इतिहास ■ संसदेच्या अधिवेशनासाठी लंके संसद भवनात दाखल ■ खा. लंके मंगळवारी घेणार शपथ

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**तब्बल ७४ वर्षांच्या बहुप्रतिक्षेनंतर खासदार नीलेश लंके यांच्या रूपाने पारनेरच्या भूमिपुत्राने सोमवारी, २४ जुन रोजी संसदेत पाहिले पाऊल टाकले. संसदेत पारनेरला कधी प्रतिनिधीत्व मिळणार ? या प्रश्नाचे उत्तर खा. नीलेश लंके यांनी इतिहास घडवत दिले असून मंगळवारी संसदेमध्ये शपथ घेण्यासाठी लंके यांचा २९८ हा क्रमांक निश्चित करण्यात आला आहे.**

सन १९५१ मध्ये पहिली लोकसभा अस्तित्वात आली. त्यानंतर पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणूकांमध्ये स्व. कॉ. बाबासाहेब ठुबे यांनी कम्युनिष्ट पक्षाच्या वतीने तर स्व. सॉ. गुलाबराव शेळके यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविली. मात्र दोन्ही निवडणूकांमध्ये पारनेरच्या या भूमिपुत्रांना यश आले नाही. कॉं. बाबासाहेब ठुबे यांनी कोपरगांव लोकसभा मतदारसंघातून कम्युनिष्ट पक्षाच्या वतीने निवडणूक लढविताना स्व. बाळासाहेब विखे यांनी त्यांना मदतीचा शब्द दिला होता. प्रत्यक्षात मात्र विखे यांची फौज भाजपाचे उमेदवार वसंतराव गुंजाळ यांच्या पाठीशी गेल्याचा आरोप कम्युनिष्ट कार्यकर्ते आजही करत आहेत. अर्थात त्या निवडणूकीत स्व. बाबासाहेब ठुबे यांचा मोठा पराभव झाला असला तरी भाजपाचे उमेदवार वसंतराव गुंजाळ यांनाही यश मिळू शकले नव्हते.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसची स्थापना केली. त्यानंतर झालेल्या लोकसभा व विधानसभेच्या एकत्रीत निवडणूकीसाठी शरद पवार यांच्या आग्रहाखातर स्व. सॉ. गुलाबराव शेळके यांनी निवडणूक लढविली. विधानसभेला तत्कालीन आमदार वसंतराव झावरे हे रिंगणात होते. लोकसभेसाठी कॉंग्रेसचे उमेदवार गोविंदराव आदिक तर विधानसभेसाठी स्व. ज्ञानदेव पठारे हे होते. त्यावेळी स्व. बाळासाहेब विखे यांनी शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढवून ती जिंकली. शिवसेनेचे सबाजीराव गायकवाड हे विधानसभेचे उमेदवार म्हणून त्यांच्यासोबत होते, तर मा. आ. नंदकुमार झावरे हे अपक्ष म्हणून रिंगणात होते. या निवडणूकीत लोकसभेमध्ये स्व. गुलाबराव शेळके यांच्यासह गोविंदराव आदिक हे पराभूत झाले. विधानसभेला वसंतराव झावरे यांनी विजय संपादन केला. सबाजीराव गायकवाड व नंदकुमार झावरे हे पराभूत झाले होते.



■ लोकसभा अधिवेशाच्या पहिल्या दिवशी संसदेत प्रवेश करीत खा. नीलेश लंके यांनी पारनेर तालुक्याचे खासदारकीचे स्वप्न पुर्ण केले.

### स्व. शेळके यांना ऐनवेळी उमेदवारी

स्व. बाबासाहेब ठुबे यांच्यापेक्षा स्व. गुलाबराव शेळके हे लोकसभा निवडणूकीत विजयी होतील अशी पारनेरकरांना अपेक्षा होती. परंतू पारनेरकरांकडूनही त्यांना फारशी साथ लाभली नाही. इतर तालुक्यांमध्येही स्व. शेळके हे अपेक्षित मते घेऊ शकले नाहीत. अर्थात स्व. शेळके यांना ऐनवेळी निवडणूकीच्या रिंगणात उतरविण्यात आल्याने पक्षाच्या यंत्रणेवरच त्यांना विसंबून रहावे लागले. दुसरीकडे विखे यांची यंत्रणा सक्षम असल्याने त्यांनी या निवडणूकीत सहज विजय संपादन केला.

### लंके यांच्याकडून खासदारपदाचे गिफ्ट

सन २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत नीलेश लंके हे उमेदवार असणार याची कुणकूण सुमारे अडिच तिन वर्षांपूर्वीच लागली होती. शरद पवार यांनी लंके यांनी ही निवडणूक लढवावी असा शब्द टाकला होता. पवारांचा शब्द प्रमाण माणून लंके यांनी संपूर्ण मतदारसंघात संपर्क वाढविला होता. त्याचाच फायदा त्यांना झाला. त्यांनी डॉ. सुजय विखे यांच्यासारख्या बलाढय उमेदवाराचा पराभव करत पारनेरकरांना खासदारपदाचे गिफ्ट दिले. अर्थात पारनेरकरांनीही लंके यांना सर्वाधिक मताधिक्य देत आपली भूमिका चोखपणे निभावली.

# ‘पिपाणी’ निवडणूक चिन्हांच्या यादीतून वगळा

■ शरद पवार गटाची निवडणूक आयोगाकडे मागणी ■ सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा इशारा

मुंबई : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावा घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सोमवारी निवडणूक आयोगाकडे एका पत्राद्वारे निवडणूक चिन्हांच्या यादीतून पिपाणी हे चिन्ह वगळण्याची मागणी केली आहे. पिपाणी या चिन्हामुळे लोकसभा निवडणुकीत आम्हाला जबर फटका बसला. त्यामुळे हे चिन्ह निवडणूक चिन्हांच्या यादीतून वगळण्यात यावे, असे या पक्षाने म्हटले आहे. शरद पवार गटाने या प्रकरणी सुप्रीम कोर्टात दाद मागण्याचाही इशारा दिला आहे.**



राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हावर लोकसभेच्या १० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ८ जागांवर त्यांचा विजय झाला. सातारा लोकसभा मतदारसंघात त्यांचा थोडक्यात पराभव झाला. या ठिकाणी तुतारीशी साधर्म्य असणाऱ्या पिपाणीवर निवडणूक लढवणाऱ्या अपक्ष उमेदवाराला बरीच मते मिळाली. इतरही मतदारसंघांत शरद पवार गटाला पिपाणीचा फटका बसला. या पार्श्वभूमीवर पक्षाने केंद्रीय निवडणूक आयोगाला पत्र पाठवून पिपाणी निवडणूक चिन्हांच्या यादीतून वगळण्याची मागणी केली आहे.

**सुप्रीम कोर्टात जाण्याचा इशारा**

पिपाणी चिन्हामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभा निवडणुकीत मोठे नुकसान झाले. त्यामुळे निवडणूक आयोगाने यासंबंधी योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली जाईल, असा इशारा शरद पवार गटाने आपल्या पत्राद्वारे दिला आहे.

**साताऱ्यात पिपाणीला ३५ हजार मते**

उल्लेखनीय बाब म्हणजे सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांचा ४५ हजार मतांनी पराभव झाला होता. पण याच मतदारसंघात पिपाणी चिन्हावर निवडणूक लढवणाऱ्या अपक्ष उमेदवाराला तब्बल ३७ हजार मते मिळाली होती. यावर राष्ट्रवादीचा आक्षेप आहे.

**पिपाणीमुळे मतदारांमध्ये संभ्रम झाला**

या प्रकरणी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले की, आम्ही भाषणात तुतारी चिन्हाचा प्रचार करत होतो. पण पिपाणीमुळे मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. आम्ही त्याची निवडणूक आयोगाकडे तक्रार केली. पण त्याची दखल घेतली गेली नाही. आता पक्षाने पुन्हा एकदा निवडणूक आयोगाला पिपाणी हे चिन्ह वगळण्याची विनंती केली आहे. निवडणूक आयोगाने आमच्या मागणीचा विचार केला नाही, तर या प्रकरणी सुप्रीम कोर्टातही दाद मागितली जाईल, असे ते म्हणाले.

# राज्यात दंगली घडवण्याचा भुजबळ यांचा डाव

■ या वयात मराठ्यांची नाराजी ओढवून घेऊ नका ■ मनोज जरांगेंचा छगन भुजबळांवर हल्ला

छ.संभाजीनगर : प्रतिनिधी

**राज्यात दंगली घडवण्याचा भुजबळ यांचा डाव आहे असा गंभीर आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर केला आहे. तसेच त्यांनी आता राज्यातील सर्व मराठा नेत्यांना आरक्षणासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. आज छत्रपती संभाजीनगरमध्ये ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. राज्यात सध्या ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे आणि छगन भुजबळ यांच्यातील संघर्ष विकोपाला गेला आहे.**



**या वयात मराठ्यांची नाराजी ओढवून घेऊ नका**

आम्ही आधी आंदोलनाला बसलो. तिथे आमच्यापुढे दुसरे आंदोलन उभे केले. मराठा समाजचे आंदोलन कोणी भरकटवले? भुजबळ यांचा राज्यात दंगली घडवण्याचा प्रयत्न आहे. भुजबळ हे राज्यात चिथावणी देत आहेत. या वयात मराठ्यांची नाराजी ओढवून घेऊ नका. कारण तुम्ही कितीही एकवटले तरी मराठा समाजाची संख्या ही राज्यात ५०% आहे हे लक्षात ठेवा, असा इशारा मनोज जरांगे यांनी भुजबळांना दिला आहे.

**आता तरी त्यांनी मराठा समाजाच्या बाजूने उभे राहावे** उर्वरीत पान ३ वर

# लोकसभेच्या अधिवेशनास सुरूवार; खासदारांना खासदारकीची शपथ देण्यास प्रारंभ

नरेंद्र मोदी शपथ घेताना विरोधकांनी दाखविल्या संविधानाच्या प्रती

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

**देशात सलग तिसऱ्यांदा राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार स्थापन झालं असून १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाला आजपासून (२४ जून) सुरुवात झाली आहे. आज अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी लोकसभेत खासदारांना खासदाकीची शपथ दिली जात आहे.**

दरम्यान, सभागृहात आणि सभागृहाबाहेर अनेक घटना घडल्याचं पाहायला मिळाली. अधिवेशन सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी ससदेबाहेर हातात संविधानाच्या प्रती घेऊन घोषणाबाजी केली. तसेच आम्ही देशाची लोकशाही आणि संविधान टिकवून ठेवू असा विश्वास व्यक्त केला. भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांचा लोकशाही आणि संविधानाला धोका असल्याचं विरोधी पक्षांनी म्हटलं आहे.



दरम्यान, विरोधी पक्षांमधील सर्व खासदार संविधानाच्या प्रती घेऊन संसदेत दाखल झाले. पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी खासदारकीची शपथ घेतली तेव्हाकॉंग्रेसखासदार राहुल गांधी यांनी मोदींना संविधानाची प्रत दाखवली. खासदारांचा शपथविधी सुरू झाल्यानंतर लोकसभेच्या हंगामी अध्यक्षांनी नरेंद्र मोदींना शपथ घेण्यासाठी पाचारण केलं. मोदी त्यांच्या बाकावरून उठून मंचाकडे जात असताना आणि शपथ घेत असताना राहुल गांधी यांनी हात उंचावून त्यांना संविधानाची प्रत दाखवली. राहुल गांधी यांच्या हातात लाल रंगाची संविधानाची मिनी कॉपी होती. मोदींची शपथ पूर्ण होईपर्यंत विरोधी पक्षांचे खासदारही त्यांना संविधानाची प्रत दाखवत होते.

तत्पूर्वी कॉंग्रेस अध्यक्ष उर्वरीत पान ३ वर

# जूनच्या मान्सूनची भर जूलैत निघणार

भारतीय हवामान विभागाचा अंदाज

नवी दिल्ली : वृत्तसंस्था



**भारतील शेतकऱ्यांसह सर्वांचे लक्ष मान्सूनच्या पावसाकडे लागलेले असते. गतवर्षीच्या तुलनेत यंदा मान्सून लवकर भारतात दाखल झाला. मात्र, महाराष्ट्रातील काही भागात पोहोचल्यानंतर मान्सूनचा वेग मंदावला होता. आता भारतीय हवामान विभागाने नव्याने जारी केलेल्या अंदाजानुसार ३ जूलैपर्यंत मान्सून देशात पुन्हा आगेकूच सुरु करेल. उत्तर पश्चिम भारतात मान्सूनचा पाऊस जोरदार हजेरी लावण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा या राज्यांमध्ये मान्सूची प्रतीक्षा आहे.११ जून नंतर भारतात मान्सूनचा वेगव मंदावला होता. दोन दिवसांपूर्वी मान्सून मध्य भारताच्या पुढे पोहोचला होता.** उर्वरीत पान ३ वर









# प्रगतीमंत्र

# एमएचटी-सीईटीचा निकाल लांबला!



### असा पाहता येणार निकाल

परीक्षार्थींनी mahacet.org या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी. त्यानंतर होमपेज समोर येईल. होमपेजवरील स्कोअर कार्ड लिंकवर क्लिक करा. आता अर्ज क्रमांक, जन्मतारीख आणि पासवर्ड वापरून लॉगिन करा. आता तुमचा निकाल स्क्रीनवर दिसेल. निकाल डाऊनलोड करीन प्रिंटआउट काढून घ्या.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलतर्फे घेण्यात आलेल्या एमएचटी-सीईटी परीक्षेतील पीसीएम आणि पीसीबी ग्रुप परीक्षेचा निकाल १० जूनला जाहीर करण्यात येणार होता. परंतु, आता निकाल १९ जूनपूर्वी जाहीर करण्यात येणार असल्याचे सीईटी सेलकडून जाहीर करण्यात आले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर betbell.mahabet.org या संकेतस्थळावर परीक्षार्थींना निकाल पाहता येणार आहे. सीईटी सेलने एमएचटी-सीईटीच्या आक्षेपांबाबत दिलेल्या स्पष्टीकरणानुसार निकालाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. तरीदेखील संबंधित निकाल हा १९ जूनपूर्वी लागणार असून, परीक्षार्थींना त्यांच्या लॉगिनमध्ये पाहता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या वर्षी एमएचटी-सीईटी २०२४ परीक्षा ३० सत्रांमध्ये घेण्यात आली.

### सीबीएसईच्या दहावी-बारावी पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसईन दहावी- बारावी पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक cbse.gov.in या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे विद्यार्थी अधिकृत वेबसाइटला भेट देऊन आपले वेळापत्रक डाउनलोड करू शकतात. सीबीएसईने जाहीर केलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार बारावीच्या सर्व विषयांच्या परीक्षा १५ जुलै २०२४ रोजी फक्त एकाच दिवशी घेतल्या जातील. दहावीची परीक्षा १५ ते २२ जुलैदरम्यान सहा दिवस असणार आहे. दरम्यान, यावर्षी दहावीच्या १ लाख ३२ हजार आणि बारावीच्या १ लाख २२ हजार विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेसाठी बसण्याची संधी आहे. हे विद्यार्थी १५ जूनपर्यंत सीबीएसईच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

# 'नीट' व्यतिरिक्त १२ वीनंतरचे वैद्यकीय पर्याय!



**राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा (NEET) देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि आरोग्य सेवा क्षेत्रात करियर करायचे असते. परंतु तुम्ही नीट क्वालिफाय करण्यास अक्षम ठरल्यास निराश होऊ नका. असे अनेक कोर्स आहेत ज्याद्वारे तुम्ही आरोग्य सेवा क्षेत्रात उत्तम करियर बनवू शकता. यासाठी नीट देखील आवश्यक नसते.**

- बीटेक बायोमेडिकल : बीटेक इन बायोमेडिकल इंजिनीअरिंग हा चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम (Biomedical Engineering) आहे. १२ वी नंतर विज्ञानात या प्रवेश घेता येतो. यानंतर बायोमेडिकल तंत्रज्ञ, बायोमेडिकल अभियंता आणि बायोकेमिस्ट म्हणून काम करण्याचा मार्ग मोकळा होतो.
- बीएससी न्यूट्रिशन : बीएससी न्यूट्रिशन तीन वर्षांचा यूजी कोर्स आहे. यात विज्ञान आणि आहार आणि पौष्टिक मूल्यांच्या सर्व बाबींबद्दल तपशीलवार शिकवले जाते. पोषण व आहारशास्त्रात बीएससी केल्यानंतर उमेदवार रुग्णालये, आरोग्य दवाखाने, आरोग्य केंद्रे किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये आहारतज्ज्ञ किंवा पोषण विशेषज्ञ म्हणून काम करू शकतात. पगारही चांगला मिळतो.
- बीए मानसशास्त्र : इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांप्रमाणे सायकॉलॉजीसाठी बारावीमध्ये सायन्स अनिवार्य नाही. कला किंवा वाणिज्य शाखेचे विद्यार्थी देखील मानसशास्त्रामध्ये पदवी प्राप्त करू शकतात. यानंतर, आरोग्य किंवा मेंटल केअर काऊन्सिलर, कन्स्ल्टंट म्हणून काम करता येते. किंवा मग क्रिमीनल जस्टीस किंवा किंवा सामाजिक कार्य क्षेत्रात करियर करता येते.
- बीएससी फिजिओथेरपी : बीएससी फिजिओथेरपी तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आहे. हे पूर्ण झाल्यानंतर आपल्याकडे व्याख्याता, फिजिओथेरपिस्ट, संशोधक, संशोधन सहाय्यक, क्रीडा फिजिओ रिहॅबिलिटेटर, थेरपी मॅनेजर यासह अनेक क्षेत्रात काम करण्याची संधी आहे. एखाद्या रूग्णालयात किंवा खाजगी क्लिनिकमध्येही काम करता येते.



### बॅचलर इन फार्मसी

बॅचलर इन फार्मसीला सामान्यतः बीफार्मा (BPharma) असेही म्हणतात. यामध्ये औषधांचा अभ्यास केला जातो. औषधे तयार करण्याचे तंत्र शिकवले जाते. भारतासह अनेक देशांमध्ये फार्मसिस्ट होण्यासाठी ही पदवी आवश्यक आहे. याद्वारे आपण फार्मास्युटिकल उद्योग, हर्बल उद्योग, सौंदर्यप्रसाधन उद्योग किंवा क्लिनिकल संशोधन क्षेत्रात उत्तम करियर करू शकता. या व्यतिरिक्त उत्पादन, गुणवत्ता नियंत्रण, संशोधन आणि विकास इत्यादी सरकारी विभागांमध्येही रोजगार निर्माण होतात. बरीच विद्यापीठे व संस्था स्वतंत्र प्रवेश परीक्षेद्वारे या कोर्सला प्रवेश देतात. नीट परीक्षा आयोजित करणारी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) संस्था देखील फार्मसीसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा घेते.

#### हे अभ्यासक्रम देखील चांगले पर्याय

- बीएससी कार्डियाक परफ्यूजन (BSc Cardiac Perfusion)
- बीएससी बायोटेक्नॉलॉजी (BSc Biotechnology)
- बीएससी मायक्रोबायोलॉजी (BSc Microbiology)
- बीएससी कार्डिओ-व्हस्कुलर टेक्नॉलॉजी (BSc Cardio-Vascular Technology)
- बॅचलर ऑफ ऑक्युपेशनल थेरपी (B.O.Th) (Bachelor of Occupational Therapy)

# कृषी क्षेत्रात विविध संधी!

**पारंपारिक शेतीबरोबर व्यावसायिक शेतीकडे वाटचाल यामुळे कृषी क्षेत्रात विविध संधी उपलब्ध होत असताना त्याकडे तरुण पिढीने डोळसपणे पाहणे आवश्यक आहे. भवितव्याच्या दृष्टीने कृषी क्षेत्रातील करिअर संधी फार मोठी ठरू शकते. या ग्रीन करिअर निवडीचा फायदा आहे नव्या जोमाने नव्या दृष्टीने, नव्या शिक्षण पद्धतीने या कृषी क्षेत्राकडे पाहिल्यास प्रगतशील करिअर घडू शकते...**



**ॲग्रो- टुरिझम :** ॲग्रो- टुरिझम हा व्यवसायसुद्धा अलीकडे भरभराटीस आला आहे. त्याला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. कृषी पदवीधारक अनेक क्षेत्रात कार्य करत असतो. करिअरची निवड करताना शेतीमध्ये आवड असणे आवश्यक आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधक वृत्ती, विकासाची ओढ, पर्यटन, उद्योग, संशोधन, बँकिंग मार्केटिंग प्रोसेसिंग या विषयाची सुद्धा आवड असली पाहिजे. हे सर्व सेक्टर मिळाल्यामुळे 'ॲग्रोटुरिझम' सर्वसमावेशक झाले आहे.

### संशोधन- व्यवसाय

कृषी संशोधन आणि व्यवसाय संपूर्णपणे खासगी क्षेत्रातच आहे असं नाही. शासकीय स्तरावरही अनेक संशोधन होत असून तिथेही संधी आहेत. शेती व्यवसायात-शेतकरी (प्रमुख घटक) अशासकीय संस्था बी-बियाणे कारखानदार, खत निर्मितीचे कारखानदार, शेती औषधी उत्पादक, कृषी अवजारे निर्माते व्यापारी, वितरक-विक्रेते, कृषीउत्पन्न बाजार मोठ्या खरेदी विक्री संघ असे सर्वजण कार्यरत आहेत. त्या त्या स्तरावर संधी उपलब्ध होण्याचे प्रमाण संशोधनामुळे वाढत आहे. कृषीसंधोधनात संशोधक फार मोलाची झेप घेत आहेत. कृषीजैविकतंत्रज्ञान, भौतिकशास्त्र, प्राणीशास्त्र, वनौषधी कृषीविकास तंत्रज्ञान, कृषीसेवा उद्योग, प्राणीपालन, संगोपन अशा विविध शाखांमध्ये कृषीस्तानकांना शिक्षणाच्या उच्चशिक्षणाच्या व कर्तृत्व दाखविण्याच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत.



### शेती हा उद्योग

कृषीक्षेत्रात खऱ्या अर्थाने येत्या काळात करिअर संधीची रेलचेल आहे. जागतिक स्तरावर शेतीकडे उद्योग म्हणून पाहिले जात आहे. धान्य, फळे, भाजीपाला, दूध या उत्पादनात भारताचा तिसरा क्रमांक लागतो; परंतु उत्पादकतेमध्ये आपण ५० व्या स्थानावर आहोत. ही लक्षात घेण्याजोगी बाब आहे. एकीकडे उत्पादकता घटत आहे. उत्पादन काही प्रमाणात वाढत आहे. परंतु त्यामध्ये सातत्याने वाढ होणे गरजेचे आहे. दूध उत्पादन ६१ मिलियन मेट्रिक टन एवढे असून यात संबंधित उद्योगांनी हे उत्पादन ३१००० कोटीपर्यंत वाढविणे अपेक्षित आहे. फळ व भाजीपाला ९० ते १५० मिलीयन मेट्रिक टन वाढविणे गरजेचे आहे. संबंधित उद्योग व कारखानेसुद्धा त्याच प्रमाणात वाढत आहे. कृषी क्षेत्रात झपाट्याने होणारे बदल, आव्हाने लक्षात घेता कृषीपूरक उद्योग सुद्धा झपाट्याने पुढे येत आहेत. भविष्यात सुद्धा येत राहतील. जागतिकीकरणात संकल्पना संशोधन, विकासदर, गरजा यांत्रिकीकरण, सरकारी धोरण हे सर्व काही झपाट्याने बदलत आहे. यामुळे अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत.

### संधी कोणत्या सेक्टरमध्ये ?

व्यवसाय, उद्योग, शासकीय संस्था, विमा, बँका, अभियांत्रिकी, कृषीव्यवस्थापन, कृषी संशोधन प्राणीशास्त्र अशी निरनिराळ्या कार्यक्षेत्र विकसनशील आहेत. पीक लागवड, भाजीपाला फळे, फुले, रोप आणि बी-बियाणं यामध्ये जैवतंत्रज्ञान, पिकावर पडणारे प्रतिबंधक औषधी अशा क्षेत्रामध्ये संशोधन संधी आहेत. कृषीमाल खरेदी-विक्री, वेअर हाउसिंग, पॅकिंग, कृषी पीक विमा सहकारी उद्योग, जमीन सपाटीकरण, धान्यग्रेडिंग, कापूस लागवड या क्षेत्रात कृषीपदवीधरास संधी आहे. कृषी उद्योगाचा विस्तार हा महत्त्वपूर्ण राष्ट्रीय जिव्हाळ्याचा उद्योग विविध क्षेत्रात विकसित झालेला आहे. बी-बियाणे, खते, औषधे, शेती अवजारे, पॅकेजिंग, निर्यात तेल उत्पादन, दूध प्रक्रिया अशा उत्पादन क्षेत्रामध्ये हजारो उद्योग गुंतलेले आहेत. उद्योग क्षेत्रामध्ये ॲग्रीकल्चरल इंजिनीअरिंग, ॲग्रीकल्चरल, हॉर्टीकल्चरल, बायो-टेक्नालॉजी फूड टेक्नालॉजी असे प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक असते. उत्पादन पॅकेजिंग, मार्केटिंग सेल्स व्यवस्थापन या क्षेत्रामध्ये करिअर संधी उपलब्ध आहेत. कृषीपदविका ते पीएचडीपर्यंत तसेच विस्तारित अभ्यासक्रम व अनेक प्रशिक्षण कार्यक्रम, विद्यापीठ, महाविद्यालयातून शिकविले जातात.

### सार्वजनिक क्षेत्रात नोकऱ्या

सार्वजनिक क्षेत्रामध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरावर 'कायदेविषयक' बाबी, 'विकास' विषयक बाबी, 'सेवा व मार्गदर्शन' इत्यादी करता संस्था कार्यरत आहेत. अनेक संस्थामध्ये विविध स्तरावर खूप नोकऱ्या उपलब्ध आहेत. प्रत्येक राज्यामध्ये कृषी खात्याचे विविध विभाग कार्यालय जिल्हा व तालुका पातळीवर काम करत असतात. या कार्यालयालगत मार्गदर्शन, सेवा, विकास कामे, निरीक्षण आकडेवारी अशी वेगवेगळी कामे पाहिली जातात. National seed corporation warehousing corporation form corporation food corporation अशी कार्यालये शेती विषयक धोरणे व काम पहात असतात या कार्यालयातून कृषीपदवीधारकांना, उच्चशिक्षिताना पदवीधारकांना नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत. या अशा Agriculture office, seed production, seed testing officer, plant protection officer scientist, soil conservation officer अशा विविध पदावर नोकऱ्या उपलब्ध आहेत. संबंधित खाते व कॉर्पोरेशनकडून मोठमोठ्या वृत्तपत्रातून जाहिराती प्रसिद्ध होतात.

# सीए परीक्षेचे हॉलतिकीट उपलब्ध

चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया अर्थात आयसीएआयने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) फाउंडेशन कोर्सच्या जून २०२४ सत्राच्या परीक्षेत बसण्यासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी नुकतेच हॉलतिकीट उपलब्ध करून दिले आहे. उमेदवार icai.org या अधिकृत वेबसाइटवरून आपले प्रवेशपत्र डाऊनलोड करू शकतात. विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेशपत्र डाऊनलोड केल्यानंतर त्यावर दिलेले तपशील (नाव, आई-वडिलांचे नाव, जन्मतारीख, फोटो इ.) तपासावेत. यामध्ये काही त्रुटी असल्यास उमेदवारांनी आयसीएआयच्या विद्यार्थी हेल्पलाइनशी संपर्क साधावा. यापूर्वी आयसीएआयने सीए फाउंडेशन जून २०२४ परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. संस्थेने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार



फाउंडेशन कोर्सच्या परीक्षा २०, २२, २४ आणि २६ जून २०२४ रोजी घेतल्या जातील. उमेदवारांनी हॉलतिकीट डाऊनलोड करण्यासाठी icai.org या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी.

# एज्युकेशन लोन घ्यायचे?

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यायचा असतो पण फी आणि शिक्षण खर्च बजेटच्या बाहेर असल्याने हे स्वप्न अर्धवट राहतं. परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे बहुतांशजण या परिस्थितीतून जातात. अशावेळी शैक्षणिक कर्ज हा एक पर्याय उरतो. स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) आपल्या ग्राहकांना उत्तम शिक्षण कर्जाची सुविधा देण्यासाठी SBI Global Ed-Vantage Overseas Education Loan घेऊन आली आहे. अभ्यासासाठी परदेशात जाणाऱ्यांसाठी हे कर्ज देण्यात येत आहे.

एसबीआयच्या या कर्जावर तुम्हाला ८.५६ टक्के व्याजदर द्यावा लागेल. महिला उमेदवारांनाही ०.५० टक्के सवलत मिळेल. अभ्यास पूर्ण केल्याच्या ६ महिन्यांनंतर तुम्हाला कर्जाचे हप्ते भरावे लागतील.

### काय आहे ही योजना ?

कोणत्याही परदेशी महाविद्यालय किंवा विद्यापीठात नियमित अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना एसबीआयच्या या शैक्षणिक कर्जाची सुविधा मिळू शकते. याअंतर्गत रेग्यूलर डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट, डिप्लोमा आणि सर्टिफिकेट किंवा डॉक्टरेटसारखे कोर्स करण्यासाठी कर्ज घेऊ शकता. विद्यार्थी यूएस, यूके, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, यूरोप, जपान, सिंगापूर, हाँगकाँग आणि न्यूझीलंडमधील कॉलेज किंवा विद्यापीठामध्ये प्रवेश घेऊन या संधीचा फायदा घेऊ शकतात. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना साडेसात लाख ते दीड कोटीपर्यंत शैक्षणिक कर्ज दिले जाईल.

### अर्ज कसा करावा ?

अर्ज करण्यासाठी, तुम्हाला SBI च्या वेबसाइटला भेट द्यावी लागेल. जिथे तुम्ही क्लिक नाऊ पर्यायावर जाऊन सर्व आवश्यक माहिती भरुन आपला अर्ज सबमिट करू शकता. अर्ज केल्यानंतर, विद्यार्थी I-20 व्हिसापूर्वी कर्ज मंजूर केले जाईल. तसेच, आयकर कलम ८० (ई) अंतर्गत कर सवलत देखील देण्यात येईल. तुम्हाला यासाठी दहावी, बारावी आणि पदवीच्या गुणपत्रकासह प्रवेश परीक्षेचा निकालही दाखवावा लागेल. याशिवाय, प्रवेश पुरावा म्हणून विद्यापीठाचे प्रवेश पत्र, ऑफर लेटर किंवा ओळखपत्र असणे आवश्यक आहे. तसेच अभ्यासक्रमाच्या खर्चाचा तपशील, फ्रीशीप किंवा स्कॉलरशीपची कॉपी, गॅप सर्टिफिकेट, बॉरोअर आणि गॅरेंटरचा एक पासपोर्ट साइट फोटो आणि ७.५० लाखापर्यंत कर्जासाठी अर्जदारासोबतच गॅरेंटरची असेट लॅबिलिटी कागदपत्रे असणे गरजेचे आहे.

तुम्ही कर्जाची रक्कम १५ वर्षांमध्ये परत करू शकता. या शैक्षणिक कर्जाअंतर्गत, प्रवास खर्च, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, ग्रंथालय शुल्क आणि प्रयोगशाळा शुल्क यासारख्या खर्चांचा समावेश केला जाईल. या व्यतिरिक्त, पुस्तके, उपकरणे, साधने, गणवेश आणि कॉम्प्युटर संबंधित खर्च देखील समाविष्ट केला जाईल. या व्यतिरिक्त, प्रोजेक्ट वर्क, प्रबंध आणि २० टक्क्यांपर्यंत अभ्यास दौरा खर्च केला जाईल. बिल्डिंग फंड आणि परताव्यायोग्य ठेवी यासारख्या खर्चाचाही यामध्ये समावेश होतो.

# मोबाईल ॲप विकसित करणारी नगरची शिक्षक बँक पहिली : मराठे

**■ बँकेच्या मोबाईल बँकिंग प्रणालीचे लोकार्पण संपन्न ■ पगारदार नोकरांच्या आर्थिक संस्थेसाठी रिझर्व बँकेने वेगळे नियम करावेत : तांबे**

नगर : प्रतिनिधी

**नगर जिल्हा हा सहकार क्षेत्रामध्ये खूप आघाडीवर आहे एकेकाळी देशाला दिशा देण्याचे काम जिल्ह्याच्या सहकारी चळवळीने केलेले आहे. अहमदनगर जिल्हा शिक्षक बँकेचे कार्य उत्कृष्ट आहे बँकेच्या ठेवी सभासदांसाठी राबविलेल्या योजना या इतर संस्थांना दिशादर्शक आहेत आगामी काळामध्ये बँकेने आधुनिकतेचा स्वीकार करून डिजिटलायजेशन वाढवावे कारण जगाच्या दृष्टीने येणारा काळा डिजिटल जमाना आहे. शिक्षक बँकेच्या राहता शाखेसाठी निश्चित सहकार्य करू असे आश्वासन रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांनी दिले.**

अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या मोबाईल बँक प्रणालीचे उद्घाटन मराठे यांच्या हस्ते एका शानदार समारंभात संपन्न झाले त्यावेळी ते बोलत होते अध्यक्षस्थानी शिक्षक नेते बापूसाहेब तांबे होते.

व्यासपीठावर सहकार भारतीचे राज्य सचिव मधुसूदन पाटील ,कोकण विभागाचे सहविभाग प्रमुख राजू ठाणगे ,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव ,उपाध्यक्ष दत्ता पाटील कुलट ,महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा विद्याताई आढाव ,राज्य संपर्कप्रमुख गोकुळ कळमकर ,शिक्षक नेते राजू शिंदे, ऐक्य मंडळाचे नेते बाळासाहेब कदम शरद वांडेकर ,उच्च अधिकार समितीचे अध्यक्ष अर्जुन शिरसाठ, गुरुमाऊली मंडळाचे जिल्हाध्यक्ष सुरेश निवडूंगे, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबन गाडेकर, महिला आघाडीचे अध्यक्ष वृषाली कडलग ,परिवर्तन मंचचे नेते राजेंद्र विधाते,नाशिक विभागीय अध्यक्ष राजेंद्र सदगीर, विकास मंडळ सल्लागार समितीचे



अध्यक्ष भास्करराव कराळे, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप मुरदारे आदींची उपस्थिती होती.

मराठे पुढे म्हणाले कि देशाच्या अर्थकारणाचा विचार करता देशात एक लाख पेक्षा जास्त सहकारी संस्था आहेत त्यापैकी फक्त ७२ हजार संस्था आपला वार्षिक हिशोब सादर करतात इतर करीत नाही त्यांच्यासाठी केंद्र सरकारने सहकार भारतीच्या पुढाकारातून केंद्रात सहकार खात्याची स्वतंत्र निर्मिती केली आहे त्या मार्फत देशातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन करण्याचे काम सुरू आहे.देशाची अर्थव्यवस्था मजबूत आहे असे सांगून शिक्षक बँकेने आपली गुंतवणूक वाढवावी तसेच विविध योजना राबवून सभासदांना अधिक चांगली सेवा द्यावी असे ही ते म्हणाले. शिक्षक बँक आपल्या सभासदांसाठी राबवित असलेल्या विविध योजना या निश्चितपणे कौतुकास्पद व अनुकरणीय आहेत असे प्रशंसोद्गार ही त्यांनी काढले.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी शिक्षक बँकेचे आजपर्यंतच्या वाटचालीचा इतिहास सांगून बँकेच्या प्रगतीमध्ये आजपर्यंतच्या सर्व संचालकांचा मोलाचा वाटा आहे याचा आवर्जून उल्लेख केला. पगारदार कर्मचाऱ्यांची संस्था म्हणून रिझर्व बँकेने पगारदार नोकरांच्या संस्थांना वेगळे नियम करण्याची आवश्यकता आहे कारण नागरी बँकांना लावले जाणारे नियम पगारदर नोकरांच्या बँकांना लावल्यास यातून विविध अडचणी निर्माण होतात असे सांगून शिक्षक बँकेची राहता शाखा निर्माण होण्यासाठी आलेल्या अडचणी त्यांनी विशद केल्या त्यातून निश्चितपणे मार्ग काढण्यासाठी मराठे साहेब यांचे सहकार्य मिळेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी राज्य संघाचे अध्यक्ष केशवराव जाधव,सहकार भारतीचे सचिव मधुसूदन पाटील कोकण विभागाचे सहप्रमुख राजू ठाणगे कोल्हापूर शिक्षक बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब निंबाळकर उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष अर्जुन शिरसाठ, राजकुमार साळवे,बँकेचे माजी चेअरमन संदीप मोटे शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बबन दादा गाडेकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. बँकेचे चेअरमन रामेश्वर चोपडे यांनी प्रास्ताविक केले पाहुण्यांचा परिचय व स्वागत संचालक कारभारी बाबर यांनी करून दिला. कार्यक्रमास बाबा आव्हाड माजी चेअरमन नवनाथ तोडमल सलीमखान पठाण,संतोष दुसुंगे,शरद सुद्रिक,सुयोग पवार बाबासाहेब खरात,राजू कुदनर,राजेंद्र निमसे,कल्याण लवांडे, सचिन नाबगे, जुनी पेन्शन हक्क संघटनेचे जिल्हाध्यक्ष नाना गाढवे, प्रवीण झावरे, बाळासाहेब कापसे,रविकिरण साळवे,मिनीनाथ देवकर,प्रकाश नांगरे ,सखाराम सातपुते,राज्य प्रतिनिधी अंजलीताई मुळे,गीता बाप्ते,वनिता सुंबे,शिक्षक बँकेचे व्हाईस चेअरमन निर्गुणा बांगर ,सरस्वती घुले,संचालक महेश भणभणे, बाळासाहेब तापकीर, संतोष राऊत,अण्णासाहेब आभाळे,कैलास सारोकते, बाळू सरोदे, गोरक्षनाथ विटनोर,कल्याण लवांडे,शिवाजी कराड,कारभारी बाबर, सूर्यकांत काळे, रमेश गोरे माऊली शिरसाट योगेश वाघमारे, कैलास सहाणे, विजय ठाणगे, डी एम शिंदे, चंद्रकांत मोरे ,जब्बार सय्यद, भाऊसाहेब दातीर,एकनाथ दादा चव्हाण, ना चि शिंदे, सुयोग पवार, जयेश गायकवाड, सचिन शिंदे, विठ्ठल काळे ,विकास मंडळाचे विश्वस्त विलास गवळी, चांगदेव काकडे, संतोष मगर, सचिव संतोष आंबेकर उपाध्यक्ष नवनाथ दिवटे,गणेश गायकवाड आदींसह जिल्हाभरातील गुरुमाऊली सदिच्छा मंडळ ऐक्य मंडळ शिक्षक भारती एकल मंच परिवर्तन मंडळचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते बँकेची सभासद ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे युट्युब लाईव्ह प्रक्षेपण जयेश गायकवाड व प्रवीण दिघे यांनी केले सुमारे ५ हजारपेक्षा जास्त लोकांनी युट्युबवर हा दिमाखदार सोहळा बघितला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीना दिघे यांनी केले तर आभार कार्यकारी अध्यक्ष नारायण पिसे यांनी मानले.

## शॉर्ट न्यूज

### मेंढपाळ महिलेवर बिबट्याचा हल्ला

■ **संगमनेर :** शेतात झोपलेल्या मेंढपाळ महिलेवर बिबट्याने हल्ला केला, यात ती जखमी झाली. ही घटना रविवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास अकलापूर रस्त्यालगत असलेल्या शेतात घडली. मीराबाई भास्कर लोहटे (रा. मांडवे बुद्रुक) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. शेतकरी सुभाष शिवाजी आहेर यांच्या शेतात मेंढपाळांचा मेंढ्यांसह रात्रीचा मुक्काम होता. रविवारी पहाटे बिबट्याने मेंढ्यांच्या बाजूला झोपलेल्या मेंढपाळांच्या कुटुंबातील महिलेच्या डाव्या पायाला पंजा मारून ओढण्याचा प्रयत्न केला. आरडाओरड झाल्याने बिबट्या पळून गेला.

### करंजीत पकडला दीडशे किलो गांजा

■ **करंजी :** नगर-पाथर्डी महामार्गावरील करंजी (ता. पाथर्डी) बायपास येथे मुंबईतील एनसीबीच्या (अंमली पदार्थ विरोध विभाग) पथकाने दोन कार पकडून दीडशे किलो गांजा पकडला. यावेळी दोन कारसह चौघेजण ताब्यात घेण्यात आले. एनसीबीने ही कारवाई अत्यंत गुप्तता राखून केली. विशेष म्हणजे स्थानिक पोलिस प्रशासनाला मागमूसही लागू न देता ही कारवाई करण्यात आली.

### भंडारदरा धरणात बुडून एकाचा मृत्यू

■ **अकोले :** पोहता येत नसल्याने आणि पाण्याचा अंदाज न आल्याने तरुणाचा भंडारदरा धरणातील पाण्यात बुडून मृत्यू झाला. सद्दाम शमीम शेख (वय २७, रा. शिर्डी) असे त्या तरुणाचे नाव आहे. शिर्डी येथून शेख व त्याचे अन्य पाच मित्र भंडारदरा येथे फिरण्यासाठी आले होते. फिरत असताना मुतखेलच्या बाजूला धरणावर हे तरुण आले. या सहापैकी तीन जण आंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरले. या ठिकाणी असलेल्या पाण्याचा अंदाज या तरुणांना आला नाही. त्यात शेख याचा पाय घसरला आणि तो पाण्यात बुडाला. पोहता येत नसल्याने शेख याचा बुडून मृत्यू झाला.

### खुनी हल्ल्यातील फरार आरोपी अखेर जेरबंद

■ **नेवासा :** तालुक्यातील वडूले येथील वकिलासह दोघांना जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या ७ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीस पोलिसांनी शेवगाव तालुक्यात अटक केली. न्यायालयाने त्यास २४ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. अर्जुन आतकरे असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. सरपंच दिनकराव गर्जे यांचा मुलगा व वकील प्रसाद यांच्यावर जमिनीच्या वादातून प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली होती. यात प्रसाद व भाऊ असे दोघे जखमी झाले. या प्रकरणी ८ जणांविरुद्ध न वासा पोलिसांर्नं जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### सोनेवाडी परिसरात जातोय मुक्या प्राण्यांचा जीव

■ **कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी परिसरात गेल्या सहा महिन्यापासून बिबट्याने नुसता धुमाकूळ घातला आहे. या बिबट्याने अनेक मुक्या प्राण्यांचा जीव घेतला. मात्र वन विभागाने सोनेवाडी ग्रामपंचायत वेळोवेळी पत्र देऊनही बिबट्या जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यास असमर्थता दर्शवली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांनी वनविभागाच्या कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

(पान १ वरून)

### राज्यात दंगली घडवण्याचा भुजबळ यांचा डाव

यावेळी मनोज जरांगे यांनी राज्यातील मराठा नेत्यांनाही आवाहन केले आहे. ते म्हणाले, राज्यातील सर्वपक्षीय ओबीसी नेते हे त्यांच्या जातीचे आरक्षण वाचवण्यासाठी एकजुटीने उभे राहिले आहेत. त्यामुळे मी एकटा पडलो असून आरक्षणाअभावी मराठा जात संकटात सापडली आहे. आपल्या समाजाच्या लेकरांचे वाटोळं होऊ द्यायचे नसेल तर आपण सगळ्यांनी एकत्र राहिले पाहिजे. सत्ताधारी पक्षातील मराठे नेते माझ्या बाजूने बोलत नाही, त्यांनी मला उघडे पाडले आहे. आता तरी त्यांनी मराठा समाजाच्या बाजूने उभे राहावे, असे मनोज जरांगे म्हणाले.

**एकटा पडलोय, तरीही मागे हटत नाही**

तसेच पुढे जरांगे मराठा समाजाला आवाहन करत म्हणाले आहे की, ६ जुलैला एकाही मराठ्याने घरात न राहता शांतता जनजागृती रॅलीला उपस्थित राहावे. कोणीही गावाच्या बाहेर किंवा लग्नकार्याला जाऊ नका. प्रत्येक जिल्ह्यातील जनजागृती रॅलीला ताकदीने प्रतिसाद द्या. आपल्याला घेरले गेले आहे, आपली जात संकटात सापडली आहे. मी एकटा पडलोय, पण तरीही मी मागे हटत नाही. माझा जीव गेला तरी ओबीसीतून आरक्षण मिळवूनच देईल, असे जरांगे यांनी स्पष्टपणे सांगितले.

### लोकसभेच्या अधिवेशनास प्रारंभ;

मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी, वरिष्ठ नेते राहुल गांधी यांच्यासह 'इंडिया'च्या खासदारांनी संसदेबाहेर "आम्ही संविधानाचं रक्षण करणार" अशा घोषणा दिल्या. यावेळी राहुल गांधी म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्रीअमित शाहहे दोघे भारताच्या संविधानावर आक्रमण करत आहेत. आम्ही ते खपवून घेणार आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीत संविधानाचं रक्षण करू. भाजपा खासदार भर्तृहरी महताब यांनी मोदींना खासदारकीची शपथ दिली. त्यानंतर भाजपा खासदार राधा मोहन सिंह यांनी पीठासीन अधिकाऱ्यांच्या पॅनेलमधील सदस्य म्हणून शपथ घेतली. भाजपा खासदार फग्गन सिंह कुलस्ते आणि राधा मोहन सिंह पुढील दोन दिवस सभागृहाच्या कामकाजात हंगामी अध्यक्षांची मदत करतील.

दरम्यान, सभागृहात जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री तथा नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारुख अब्दुल्ला म्हणाले, सर्व विजयी खासदारांचं मी अभिनंदन करतो. मला आशा आहे की ही संसद लोकशाही टिकवेल. या निवडणुकीत जो तिरस्कार आणि घृणा समाजात पसरवली गेली होती ती नष्ट होईल, अशी मी अपेक्षा करतो. देशातलं सरकार कुबड्यांर आहे, तर त्यांच्यासमोर एक मजबूत विरोधी पक्ष उभा आहे.

### जूनच्या मान्सूनची भर जूलैत निघणार

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी " जुलैच्या पहिल्या आठवड्यात मान्सून पुन्हा गती प्राप्त करेल. त्यावेळी चांगला पाऊस होईल त्यामुळे जूनमध्ये कमी झालेल्या पावसाची जुलैमध्ये भरपाई होईल, असे त्यांनी म्हटले आहे.

पुढील ३-४ दिवसात कुठं पाऊस होणार?

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार मान्सून पुढील तीन ते चार दिवसात गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगालमधील काही भाग, बिहारचा काही भाग आणि उत्तर प्रदेशातून पुढे जाईल. या ठिकाणी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २७ जून नंतर उत्तर, पश्चिम आणि मध्य भारतात पावसाचा जोर वाढेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार ऑगस्ट मध्ये ला नीना विकसित होण्याची अपेक्षा आहे. तर, अलनिनोमुळे भारतातील मान्सूनच्या पावसावर विपरीत परिणाम होत असतो. अलनिनो निर्माण झाल्यास भारतात मान्सूनचा पाऊस कमी प्रमाणात होतो.

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एम. राजीवन यांनी मान्सून पुन्हा सक्रीय होत असल्याचे म्हटले. जुलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मान्सून पोहोचेल. पुढच्या २-३ आठवड्यात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे. ला नीनाच्या प्रभावामुळे ऑगस्ट महिन्यात चांगला पाऊस होईल, अशी अपेक्षा हवामान विभागाला आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून मान्सून खोळंबला होता. जवळपास नऊ दिवस मान्सून नवसारी, जळगाव, मंडला, पेंड्रा रोड, झारसुगुडा, बालासोर, हल्दिया, पाकूर, साहिबगंज रक्सोलपर्यंत पोहोचला होता. पुढील तीन ते चार दिवसात अरबी समुद्राचा उत्तरेकडील भाग, गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या काही भागातून पुढे प्रवास करेल.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# दोन वर्षे उलटली तरी दोषारोप पत्र दाखल नाही!


**■ म्हसणे येथील धान्याच्या अपहाराचे प्रकरण ■ तक्रारदार शंकर तांबे यांचे पोलीस अधीक्षकांना साकडे**

**पळवे खुर्द : प्रतिनिधी**

**म्हसणे सुलतानपुर येथील स्वस्त धान्य दुकानातील धान्याच्या अपहाराबाबत पुरवठा निरीक्षकांनी फसवणूकीचा गुन्हा दाखल करून दोन वर्षे उलटली तरी या गुन्हयासंदर्भातील दोषारोपपत्र न्यायालयात दाखलच करण्यात आले नसल्याची गंभीर बाब उघड झाली आहे.**

म्हसणे सुलतानपुर येथील स्वस्त धान्य दुकानातील धान्याच्या वितरणात अपहार झाल्याची तक्रार शंकर रेवजी तांबे यांनी केली होती. मात्र त्यांच्या तक्रारीकडे महसूल प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने तांबे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी होउन न्यायालयाने या अपहाराप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानंतर पारनेर तहसिल कार्यालयातील पुरवठा निरीक्षक विवेक विनोद वैराळकर यांनी १७ मार्च २०२२ रोजी सुपा पोलीस ठाण्यात जनसेवा स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षांविरोधात फसवणूक, अत्यावष्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे फिर्याद दाखल केली होती.

फिर्याद दाखल होऊन दोन वर्षे उलटूनही न्यायालयात दोषारोपपत्र दाखल न झाल्याने तक्रारदार शंकर रेवजी तांबे यांनी पोलीस अधिक्षकांकडे त्याबाबत तक्रार दाखल केली. फिर्याद दाखल करण्यात आल्यानंतर वेळोवेळी तपासी अधिकारी बदलण्यात आल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आले आहे. तपास अधिकारी ओव्हळ, टी.आर.पवार तसेच एम.एच. जोजाट यांच्याकडे तपास वेळोवेळी वर्ग झाला आहे.



### तक्रारदाराला समजपत्र !

**तक्रारदार शंकर रेवजी तांबे यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केल्यानंतर दोन वर्षे विलंब होऊनही साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यासाठी वेळ लागला आहे. गुन्हयाचा तपास सुरु असून त्यात कोणत्याही प्रकारची दिरंगाई करण्यात आलेली नाही अथवा कोणावरही अन्याय करण्यात आलेला नाही दोषारोप दाखल करण्याइतपत भक्कम पुरावा प्राप्त करून लवकरात लवकर दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्याची तजवीज ठेवली असल्याचे समजपत्र विद्यमान तपासी अधिकारी एम.एच. जोजाट यांनी तक्रारदार तांबे यांना देत त्यांचा अर्ज दप्तरी फाईल करण्यात आल्याचे समजपत्रात नमुद करण्यात आले आहे.**

### अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा

**दोषारोप पत्र दाखल करणेकामी होत असलेल्या विलंबाचा चौकशी करून लवकरात लवकर दोषारोप पत्र दाखल करण्यात यावे अन्यथा औरंगाबाद खंडपीठाचा अवमान केल्याप्रकरणी याचिका दाखल करण्याचा इशारा तांबे यांनी दिला आहे.**

### तपासी अधिकारी वेळ मारून नेताहेत

**तपास अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता साक्षीदारांची संख्या जास्त असल्यामुळे संबंधित कागदपत्रे प्राप्त होण्यासाठी विलंब लागत आहे, तहसिलदार पारनेर यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे असे सांगून वेळ मारून नेण्यात येते.**

### पुरवठा अधिकाऱ्याकडे पुरावेच नाहीत

**वास्तविक सदर तपासाबाबत तपासी अधिकाऱ्यांनी तहसिल कार्यालयात जाऊन तपास करणे अपेक्षित होते. पुरवठा अधिकारी यांच्याकडे कोणतेही पुरावे नसल्याने तपासी अधिकारी तपासात टाळाटाळ करत असल्याचा तांबे यांचा आरोप आहे.**

### सेल्समन, सचिव, पुरवठा अधिकाऱ्यास अभय

**बचत गटाच्या अध्यक्षा मिराबाई रामचंद्र पठारे यांच्याविरोधातच गुन्हा दाखल करण्यात आला असून सेल्समन, पुरवठा अधिकारी तसेच सचिव यांना अभय देण्यात आल्याचे तांबे यांचे म्हणणे आहे.**

# गाडीलगांव परिसरात दुबार पेरणीचे संकट

**पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांपुढे संकट**

**गाडीलगांव : प्रतिनिधी**

**सुरूवातीच्या काळात समाधानकारक पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पिकांची मोठया प्रमाणावर पेरणी केली, मात्र गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने पेरलेल्या बियाण्यांची उगवण झाली नसल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकरी वर्गापुढे उभे राहिले आहे.**

मान्सून सक्रीय झाल्यानंतर पर्जन्यछायेखाली असलेल्या तालुक्यात तो वेळेवर येईल याची शास्वती नसते. यंदा मात्र ७ जुन ते १० जुनदरम्यान पेरणीयोग्य पाउस झाल्याने शेतकऱ्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. महागडे बियाणे खरेदी करून शेतकऱ्यांनी सोयाबिन, बाजरी पिकांची पेरणी केली. शेतीउत्पादनांना भाव नसल्याने शेतकरी आगोदरच आर्थिक संकटात आहे. याच संकटाचा सामना करीत अनेकांनी कर्ज घेउन महागडया बियाणांची खरेदी केली. आता मात्र पावसाने दडी मारली असून दुबार पेरणीसाठी खरेदी करायच्या बियाण्यांसाठी पैसे आणायचे कुठूण असा प्रश्न त्यांच्यापुढे आहे.

कांदा उत्पादनातून गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या हाती चार पैसे येत असल्याने गेल्या काही वर्षात कांद्याच्या पिकाखालील क्षेत्र वाढलेले आहे. मात्र कांद्याच्या दरात घसरण होउन कांदा मातीमोल भावाने विकला जात असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. परदेशात कांद्याला चांगला भाव मिळत असताना केंद्र सरकारने कांद्याची निर्यात बंदी केली. जोड धंदा असलेल्या दुधालाही भाव नसल्याने हा व्यवसायही आतबट्टयाचा झाला आहे. अशातच यंदाच्या खरीप हंगामात दुबार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.



### शेतकरी हाताश

**बियाण्यांच्या वाढलेल्या किमती, रासायनीक खतांचे गगणाला भिडलेले भाव यामुळे आगोदरच शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच पावसाने दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकरी वर्ग हाताश झाला आहे.**

**दत्तात्रेय भिकाजी गाडीलकर**
शेतकरी

# पोखरी, डोंगरवाडी बस सेवा सुरू करा; अन्यथा आंदोलन करू

**सरपंच प्रकाश गाजरे यांचा इशारा**



**पोखरी : प्रतिनिधी**

**तालुक्याच्या उत्तर भागातील पोखरी, वारणवाडी, डोंगरवाडी या भागात एसटी बस सेवा बंद असून ती तातडीने सुरू करण्यात यावी आशा मागणीचे निवेदन पारनेर परिवहन महामंडळ आगार व्यवस्थाकांना म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांनी दिले आहे.**

पारनेर तालुक्याच्या उत्तर भागामध्ये पोखरी, वारणवाडी, म्हसोबा झाप, कामटवाडी, डोंगरवाडी, गुरेवाडी या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज राहतो. आळेफाटा, बेल्हे, टाकळी ढोकेश्वर, पारनेर या बाजारपेठेच्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो या भागातून अनेक विद्यार्थी सुद्धा शिक्षणाच्या निमित्ताने दररोज ये-जा करत असतात. बस सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे सुद्धा नुकसान होत आहे. प्रशासनाने या बाबीचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी करत सरपंच प्रकाश गाजरे यांनी पारनेर आगार प्रमुखांना निवेदन दिले आहे.

या निवेदनामध्ये त्यांनी असेही म्हटले आहे की पोखरी, डोंगरवाडी, म्हसोबा झाप या परिसरामध्ये इतर कोणतीही प्रामुख्याने वाहतूक व्यवस्था नसल्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे तातडीने या भागामध्ये बस सेवा सुरू करावी अन्यथा १ जुलै २०२४ पासून पारनेर येथे आपल्या आगारात शालेय विद्यार्थी व आबाल वृद्धांसह धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशाराच सरपंच प्रकाश गाजरे यांनी दिला आहे.

आगार प्रमुखांना निवेदन देण्यात आले यावेळी सरपंच प्रकाश गाजरे यांच्या समवेत अशोक आहेर, युवा नेते संदीप गुंजाळ, ज्येष्ठ नेते पांडुरंग आहेर, झांबर दरेकर, साहेबराव दरेकर, आदि पोखरी, म्हसोबा झाप, डोंगरवाडी, कामटवाडी, वारणवाडी परिसरातील ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# शिवबा संघटनेचे अनिल शेटे यांचे सामाजिक योगदान मोलाचे

**जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांचे प्रतिपादन**

**निघोज : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यात शिवबा संघटना व युवा सेनेचे तालुकाप्रमुख अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे सामाजिक योगदान मोलाचे असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी व्यक्त केले.**

शिवबा संघटना, युवा सेना पारनेर तालुका तसेच निघोज ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने निघोज येथे शिवराज्याभिषेक निमित्ताने रक्तदान शिबीर, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट नूतन विश्वस्त सत्कार तसेच पत्रकार संघ नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे होते. यावेळी कार्ले बोलत होते.

यावेळी नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भास्करराव शिरोळे, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व युवा सेना तालुका प्रमुख अनिल शेटे, ज्ञानेश्वर कवडे, शिवसेनेचे माजी तालुका प्रमुख गुलाबराव नवले, जवळ्याचे माजी सरपंच डॉ सुभाष आढाव,

मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, उपसरपंच माऊली वरखडे, शिवसेनेचे तालुका उपप्रमुख उजागरे, बाजार समितीचे संचालक किसनराव सुपेकर, संतोष येवले, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, निघोज शहराध्यक्ष सचिन जाधव, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे, अनिल लंके, संतोष रसाळ, रोहिदास लामखडे, सोमनाथ वरखडे, ज्ञानेश्वर लंके, शिरूर तालुका शिवबा संघटनेचे अध्यक्ष व माळवाडीचे सरपंच सोमनाथ भाकरे, आण्णापूर ग्रामपंचायत सदस्य शिंदे, शिवबा संघटनेचे अध्यक्ष बबनराव तनपुरे, प्रमुख पदाधिकारी राजूभाऊ लाळगे, मच्छिंद्र लाळगे, शिवबा दुर्गसंवर्धन समिती पदाधिकारी बाळासाहेब भंडारी, रायचंद गुंड, ग्रामपंचायत सदस्य शंकर पाटील वरखडे, कान्हूर पठार पतसंस्थेचे मॅनेजर खंडू लामखडे , अंकुश वरखडे, अविनाश लामखडे, निलेश वरखडे, शैलेश ढवळे, स्वप्नील लामखडे, काशिनाथ वाजे, रूपेश सरोदे, निखिल लामखडे, गोकुळ वाजे, यश राहाणे, शांताराम पाडळे, सचिन कोतकर, दत्ता टोणगे, नागेश नरसाळे, नवशाद भाई, ऋषिकेश शेटे, बाळासाहेब लंके, राजू लंके, लहू गागरे, पुणे ब्लड बँक प्रतिनिधी दत्तात्रय येवले आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सकाळी दहा ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत ८४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी शिवबा संघटना, युवा सेना, शिवबा दुर्गसंवर्धन समिती व ग्रामस्थ यांच्या वतीने उपस्थितांना नाष्टा व फलोहार व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाला शुभेच्छा देण्यासाठी व अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक करण्यासाठी दिवसभरात व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी व संचालक व ग्रामस्थ यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले आहे.

शिवबा संघटना व युवा सेना पारनेर तालुका प्रमुख अनिल शेटे यांनी यावेळी सांगितले गेली पंधरा वर्षांपासून शिवबा संघटनेच्या माध्यमातून जनआंदोलन असो की सामाजिक उपक्रम या माध्यमातून शिरूर व पारनेर तालुक्यात समाजाभिमुख काम करीत असून आमचे सर्व पदाधिकारी व शेकडो सदस्य यांचे परीश्रम यासाठी महत्वपूर्ण आहेत. जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले , नित्यसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भास्करराव शिरोळे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख डॉ श्रीकांत पठारे व तालुक्यातील मान्यवर यांनी समक्ष येऊन आम्हाला सातत्याने पाठबळ दिले असून समाजसेवी कामांच्या माध्यमातून सेवाभाव हेच आमचे ब्रीद वाक्य असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसिद्ध चित्रकार ज्ञानेश्वर कवडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शिवबा संघटना पदाधिकारी राजूभाऊ लाळगे व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे नूतन पदाधिकारी रोहिदास लामखडे यांनी आभार मानले.

# रक्तदान शिबीराचा उपक्रम स्तुत्य

**खासदार नीलेश लंके यांचे प्रतिपादन**



**निघोज : प्रतिनिधी**

**रक्तदान हे श्रेष्ठ दान असून शिवबा संघटना, युवा सेना, निघोज ग्रामस्थ यांनी अनिल शेटे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून राबलेला हा सामाजिक उपक्रम स्तुत्य असून सामाजिक कामांच्या माध्यमातून सेवाभाव केल्यास त्याचा फायदा भविष्यात होतो ही आपल्या तालुक्यातील जनतेचा मनोभावे आशिर्वाद असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.**

शिवबा संघटना, युवा सेना, निघोज ग्रामस्थ यांनी आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरास खासदार नीलेश लंके यांनी भेट देऊन अनिल शेटे आणी त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, शिवसेना तालुका प्रमुख डॉ.श्रीकांत पठारे, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व युवा सेना तालुका प्रमुख अनिल शेटे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते रमेश वरखडे, पारनेर तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस कार्याध्यक्ष सोमनाथ वरखडे, दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लंके, लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठानचे मुख्य पदाधिकारी शिवाजीराव लंके, पांडुरंग कृपा सहकारी पतसंस्थेचे चेअरमन चंद्रकांत लंके, जी आर एल कंट्रक्शनचे संस्थापक अध्यक्ष गणेश लामखडे, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवा नेतृत्व रुपेश ढवण, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे सहसचिव विश्वास शेटे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, अध्यक्ष बाबाजी वाघमारे, माजी सरपंच ठकाराम लंके, ग्रामपंचायत सदस्य दिगंबर लाळगे, गणेश कवाद, सोसायटीचे उपाध्यक्ष शांताराम लाळगे, संचालक दत्तात्रय लंके, शांताराम कवाद, युवा नेते संदीप वराळ, भरत ढवळे, श्रीकांत लामखडे, लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे प्रवक्ते विकास शेटे, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान अध्यक्ष रवी रणसिंग, मोहन सुपेकर, सुखदेव ढवळे, हौशाभाऊ शेटे, रामदास गाडीलकर, राजेंद्र ढवळे, लक्ष्मण ढवळे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त अनिल लंके, रोहिदास लामखडे, शंकरराव लामखडे, संतोष रसाळ, बाळासाहेब लंके, मोहिनी वरखडे, सिमा वराळ, पारनेर तालुका फोटोग्राफर संघटनेचे पदाधिकारी हिरामण कवाद, शिवबा संघटनेचे पदाधिकारी राजूभाऊ लाळगे, शंकर पाटील वरखडे, रायचंद गुंड, बाळासाहेब भंडारी आदी ग्रामस्थ तसेच लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठान पदाधिकारी व सदस्य तसेच शिवबा संघटनेचे पदाधिकारी व सदस्य व शिवसेना पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष अनिल शेटे यांनी सांगितले की खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून गेली पावणेपाच वर्षात आमदारकीच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली आहेत. सामाजिक काम, लोकसंपर्क, आणिलोकाभिमुख विकासकामे यामुळे खासदार लंके हे धनाढ्य व्यक्तींविरोधात खासदार म्हणून निवडून आले हा आमच्यासाठी अभिमान आहे म्हणून खासदार लंके यांचा सत्कार व रक्तदान हा कार्यक्रम एकत्र ठेवला होता दोन दिवसांपूर्वी खासदार लंके निघोज येथे भव्य सत्कार सोहळ्यासाठी आले होते असे असूनही माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यांची व शिवबा संघटनेच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन खासदार लंके हे कार्यक्रम व्यस्त असताना आले हीच माणूसकीची भावना त्यांना मोठी करणारी असल्याचे प्रतिपादन शेटे यांनी व्यक्त केले.

# श्रीहरी पवळे यांचा अमलताश काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**पुण्याच्या सभागृहात पार पडला सोहळा**

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण मधील ह.भ. प. पवळे महाराजांचे जेष्ठ चिरंजीव सुप्रसिद्ध रांगोळीकार यांचे वल्लरी मीडिया प्रस्तुत वल्लरी प्रकाशनद्वारे प्रकाशित प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माधवराव पटवर्धन सभागृह सदाशिव पेठ पुणे येथे मंगळवारी ( दि.१७ जून) रोजी पार पडला.**

प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष ग.भा. चव्हाण प्रमुख पाहुणे भूषण कटककर, प्रभा सोनवणे, डॉक्टर वैशाली मोहिते, मानसी चिटणीस, संपादक श्री. वेंकटेश कल्याणकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

कार्यक्रम सत्कारप्रसंगी श्रीहरी पवळे यांनी माय माऊली ही कविता सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. याच कार्यक्रमात शुभांगी रेवतकर यांचा मुक्त मी व्यक्त मी या काव्यसंग्रहाचेही प्रकाशन झाले.

(छाया - शरद रसाळ, सुपा)



महाराष्ट्रातून आलेले कवी आणि कवयित्री सहभागी झाले होते.

यावेळी श्रीहरी पवळे, मुकुंद आठवले, अमेय बाळ, मृणाल देशपांडे, रजनी दिवेदी जयदीप वैद्य, क्षमता प्रकाश, मृणाल जैन, साधना शेळके, जयश्री महाजन, माणिक कौलगुड,सविता क्षीरसागर, शुभांगी उदगावकर, कल्याणी भाले हे सर्व कवी कवयित्री उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माया कल्याणकर यांनी अतिशय सुंदर सूत्रसंचालन करून कार्यक्रमात बहर आणला कार्यक्रमाचे अध्यक्ष ग भा चव्हाण यांनी अतिशय सुंदर मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# ज्योती येणारे यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे धडे


**केडगांवमध्ये योग दिन उत्साहात**

**केडगांव : प्रतिनिधी**

**महानगरपालिकेच्या वतीने महिलांसाठी उभारण्यात आलेल्या जीममध्ये गेल्या तीन महिन्यांपासून आहारतज्ञ तथा योग शिक्षिका ज्योती येणारे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला योगाचे धडे गिरवत आहेत. दरम्यान आंतरराष्ट्रीय योग दिन केडगांव येथे मोठया उत्साहात पार पडला. योगा करून निरोगी आरोग्याचा संदेश येणारे यांनी यावेळी दिला.**

थेरपीस्ट गायत्री गरडे यांच्या अधिपत्त्याखाली आता केडगांवमध्ये महिलांना योगाचे धडे देण्यात येत असून त्यास महिलांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. योगदिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात बोलताना ज्योती येणारे यांनी सांगितले की, निरोगी जीवनासाठी योग सर्वोत्तम ठरत असून भारताच्या योगाचा संपूर्ण जगाने स्वीकार केला आहे. योगाने अनेक आजार, विकास बरे होउन आनंदी जीवनाचा लाभ घेता येतो. अनेक दुर्धर व्याधींवर योग-प्राणायामाद्वारे मात करता येत असल्याचे येणारे यांनी सांगितले.

यावेळी वसुधा दहातोंडे, कमल कोतकर, नीता चौधरी, चारू आहिरे, मेघा कावरे, निर्मला मगर, नेहा ओझा, सुवर्णा आढाव, सारिका वाघ, नयना पळेकर, अर्चना गोडसे, वैशाली वाघ, प्रीती गुंजाळ, जयश्री मेढे, विजया पाटील, रजनी तांदळे, सुवर्णा चोरडिया, वर्षा ओसवाल, लता सातपुते, दिपाली भिंगारदिवे, केतकी पाळेकर, पुनम देशमुख, सुनिता सातपुते, संगिता गोरे, वैशाली तळेकर, कल्पना पातारे आदी महिला उपस्थित होत्या.



### एक तास दररोज योगसाधना हवी

**आजच्या धकाधकीच्या जीवनात योग साधनेला महत्व प्राप्त झाले आहे. महिलांमध्ये पीसीओडी, मासिक पाळी, थायरॉईड, मधुमेह, रक्तदाबाचे प्रमाण वाढताना दिसून येते. घर सांभाळून नोकरी, व्यवसाय करताना महिलांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. ताण-तणावापासून मुक्ती मिळविण्यासाठी, आरोग्य उत्तम राखण्यासाठी दररोज एक तास योग साधनेचा अभ्यास गरजेचा आहे. योगामुळे मन स्थिर राहते. मानसिक संतुलन सांगले राहते. सकारात्मकता वाढल्याने आरोग्य सुधारते. हार्मोन्स स्थिर राहण्यास मदत होते.**

**ज्योती येणारे**
आहार तज्ञ तथा योग शिक्षिका

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com